REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# कवी गोविंदसुतांची 'अजबळी' एक शोध



प्रा. डॉ. सौ. जयश्री संजय सातोकर
सहा. प्राध्यापक ,
प्रगती महिला कॉलेज, भंडारा (म.रा.)

## प्रस्तावना

भंडारा जिल्हयातील समर्थ महाविद्यालय लाखनीचे प्राचार्य डॉ. संजय पोहरकर कवी 'गोविंदसुत' या टोपणनावाने काव्यलेखन करतात. कवी गोविंदसुतांच्या 'कलियुगातील ध्रुवतारा' या दुसऱ्या काव्यसंग्रहातील 'अजबळी' ही एक महत्वपूर्ण कविता आहे. या कवितेचा आशय सृष्टी व्यवहारातील अत्यंत महत्त्वपूर्ण व वास्तविक असे सत्य प्रतिपादन करणारा आहे. मानवी जीवनव्यवहार हा तत्त्वज्ञानाच्या उदात्त पातळीवर नेवून कितीही आदर्श करण्याचा प्रयत्न केला तरीही निसर्गातील व्यवहार हा प्रकृतीच्या नियमानेच चालतो. 'बळी तो कान पीळी' किंवा 'शक्तीमान असेल तोच जगण्यास पात्र' हा निसर्गनियम आहे. देव—दानव हया मानवनिर्मित कल्पना आहेत. व्यवहारिक तत्त्वज्ञानाशिवाय मानव शांततापूर्ण जीवन जगूच शकत नाही. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात शांती ही अपघातात्मक अवस्था असून अस्तित्वासाठी जीवनसंघर्ष मात्र अटळ आहे. आणि त्यात शक्तीमानाचा विजयही अपरिहार्य आहे. हेच सत्य प्रस्तुत अजबळी कविता सांगून जाते. हा आशय व्यक्तीजीवन समाजजीवन व राष्ट्रजीवनालाही तंतोतंत लागू पडतो. त्यामुळेच निरनिराळया राष्ट्रामध्ये संघर्ष होतच असतात. युनोची स्थापना होवूनही सारे जग आज तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठयावर उभे आहे. अशा परिस्थितीत भारताला विजयशाली राष्ट्र म्हणून 'अजबळी' या कवितेतून सूचित होणारा प्रतिकात्मक संदेश निश्चितच चिंतनीय आहे.

संस्कृतमध्ये बळी दिल्या जाणाऱ्या बकऱ्याला उद्देशून एक प्रसिद्ध सुभाषित आहे;

"अश्वं नैव गजं नैव
व्याघ्रं नैव च नैव च ।
अजापुत्रं बलिं दद्याद्
देवो दुर्बलघातकः ।।

प्रस्तुत सुभाषित स्पष्ट करतांना अनेक प्रवचनकार या सुभाषिताला एक छोटी गोष्ट जोडतात. त्या गोष्टीत देव आणि भक्त यांच्यातील संवाद म्हणून हे सुभाषित विशद करतात. या संवादात भक्त देव प्रसन्न झाल्यामुळे देवाला विचारतो की, देवा मी तुला भेट म्हणून घोडयाचा बळी देऊ काय ? देव त्यावर गप्पच राहतो. मग त्याहूनही अधिक शक्तीमान सरस म्हणून हत्तीचा बळी देऊ काय ? असा प्रश्न करतो. तरीही देव गप्पच. त्यावर शक्तीमान आणि क्रूर शिकारी असलेल्या वाघाचा बळी देऊ काय ? असा प्रश्न भक्त करतो. तेव्हा देवाने तीनही प्रश्न ऐकून भक्ताला दिलेले उत्तर आहे की,"अरे मला घोडयाचा बळी नको, हत्तीचा बळी नको, वाघाचा बळी तर नकोच नको. देव पुढे सांगतो, अरे मी शक्तीमानांचा बळी कसा काय घेणार ? त्यापेक्षा जो प्रतिकार करू शकत नाही, दावणीला बांधला जातो अशा दुबळया बकऱ्याचा बळी दे." अर्थात देव सबलांचे संरक्षण करतो आणि दुर्बलांचा नाश करतो. हे एकच महत्त्वपूर्ण विचारसूत्र प्रस्तूत सुभाषितातून सांगितले आहे.

जगाच्या पाठीवर जीवन संघर्षाच्या युद्धात हेच विचारसूत्र अनादी काळापासून जगत् व्यवहाराला लागू आहे. माणूस जेव्हा रानटी अवस्थेत असेल व देव दानव हया कल्पनाही त्याच्या डोक्यात शिरल्या नसतील तेव्हापासून जगातील अस्तित्वाच्या लढाईत यशस्वी होण्याचे विचार सूत्र हेच राहिले आहे. जगरहाटी याच सत्यावर आधारलेली आहे. आमच्या राष्ट्रजीवनाचे तात्त्विक अधिष्ठान म्हणून हेच विचारसूत्र स्मरणात ठेवून आपल्या दैनंदिन जीवनाची वाटचाल होत राहिली पाहिजे.

वरील सुभाषिताचाच अर्थ आणि आशय अधिक विस्ताराने परंतु नेमके पणाने कवी गोविंदसुत यांनी आपल्या 'कलियुगातील ध्रुवतारा' या काव्यसंग्रहातील 'अजबळी' नावाच्या कवितेत मांडले आहे. या कवितेतही एक शब्दचित्र रेखाटले असून बे ऽ बे ऽ असा आर्त सूर आळवून 'देवा मला वाचव रे' अशी प्रार्थना करणारा बकरा दिसतो. तो देवाचे कौतुक करतांना, 'दुबळयास तू आसरा' असे विधान करतो. मी कसा निष्पाप, शुद्ध कोणालाही न छळणारा, कोणाच्या भानगडीत न पडणारा असा जीव आहे हे स्पष्ट करतो व सांगतो,

"नाही मी जगती कुणा फसविले
कोणास ना मी छळे
खातो नित्य तृणा, पिऊनी जल मी
स्वच्छंद रानी फिरे"

असे असूनही मी जंगलात फिरत असतांना माझ्यावर कुणी लांडगा आकस्मिक हल्ला करून कसा बरे मारतो ? तसेच देवा तुझे या जगात अस्तित्व असूनही मला कसे बरे कापल्या जाते ? असे अनेक प्रश्न उपस्थित करतो. तो देवाला म्हणतो, माझे प्रार्थनेचे आर्त सूर तुझ्या कानावर पडत नाहीत काय ? किंवा या जगामध्ये बहिरेपणाचे सोंग घेवून ढोंगी ईश्वर म्हणून तर मिरवत नाहीस ना ? बकऱ्याच्या हया डिवचणाऱ्या प्रश्नाला ऐकून ईश्वर बोलू लागतो. हे वर्णन करण्यासाठी कवी म्हणतात,

"होता आजवरी मुका ईश तरी
तो बोलला सत्वरी
कापा आज तया मला सुखविण्या
दुबळयास मी ना वरी"

अर्थात मी दुर्बळांचा नाश होण्यानेच सुखी होतो. मी दुबळयांवर कधीच प्रसन्न होत नाही. माझे ईश्वरीपण हेच मुळात सबलांचे रूप असून मी स्वतःच शक्ती आहे. मला मिळविणे अर्थात प्राप्त करणे आणि शक्तीला प्राप्त करणे ही एकच गोष्ट आहे. शक्तीची उपासना करणारे माझे खरे भक्त आहेत आणि हेच भक्त मला आवडतात.

"सबलांचे रूप मी स्वयेच ईश हा
शक्ती रूपे मी खरा
शक्तीला मिळवा, खरी ईश पुजा
ऐसी रूचे ईश्वरा"

हया आपल्या प्रतिपादनानंतर कवी आपला निष्कर्श मांडतांना लिहितात,

"तेव्हापासूनी या जगात जगतो
शक्ती रूपे हा नर
दुबळयांना ईश नाही कोणी जगती
कोठे नसे ईश्वर"

अर्थात या जगता ईश्वराचे साहाय्य दुबळयांना होत नसते, तर उलट दुर्बलांची चेष्टा होते. त्यांची थट्टा केली जाते, म्हणूनच कवी म्हणतात,

"सबलांच्या जगती, ईशा हसविण्या
जातो अजांचा बळी

जाणोनी जगी सत्य हेच ठरवा
ना होई मी अजबळी''

अर्थात जगातील हे सूर्य प्रकाशाइतके स्वच्छ स्पष्ट, व्यवहारिक सत्य लक्षात घेवून भारताच्या धर्मशील राष्ट्रजीवनाची वाटचाल झाली तर भारतीय राष्ट्रीय जीवनातील आनंद चिरंतन टिकून राहिल.

## उपनिषदातील तत्त्वचिंतन

आपली वेदोपनिषदेही आपल्याला आनंददायी जीवनासाठी हाच श्रेष्ठ विचार सांगून जातात. ईशावास्योपनिषदातील 14 व्या मंत्रामध्ये आनंददायी जीवनासाठी कारण ब्रह्म आणि कार्य ब्रह्म हे समजून घेण्याचा उपदेश करतात. या 14 व्या मंत्रात,

संभूतिंच विनाशं च यस्तद्वेदोभयं सह ।।
विनाशेन मृत्यूं तीर्त्वा संभूव्यामृतमश्नृते ।।

अर्थात कारण ब्रह्म व कार्य ब्रह्म हे दोन्ही जो कोणी एकत्रितपणे समजून घेतो. तो कार्यब्रह्माच्या उपासनेने मृत्यूला पार करतो आणि कारण ब्रह्मद्वारा अमरत्त्व प्राप्त करून घेतो.

वरील विचारात ईश्वराचे सत्य स्वरूप हे कारण ब्रह्म असून या कारण ब्रह्माला अनुसरून जीवनकार्य करणे हीच खरी आनंददायी ईश्वरोपासना आहे. उपनिषदामध्ये या जगासंबंधी संभूती आणि असंभूती असे दोन शब्द वापरले आहेत. दृश्य जगत म्हणजेच संभूती असून याचे संभवन म्हणजे जन्म होतो. आणि जन्म झाल्यावर जे कार्य करावे लागते त्यालाच कार्य ब्रह्म असे म्हणतात. असंभूती म्हणजे असंभवन. म्हणजे ज्याचा जन्म होत नाही ते. यासच कारण ब्रह्म म्हणतात. तत्त्वज्ञानाच्या भाषेमध्ये कार्यब्रह्म म्हणजे विशेष पदार्थाचे विश्व. तर कारण ब्रह्म म्हणजे या जगात जगण्यासाठी जो उपासनेचा अर्थात साधनेचा विषय आहे ते. कार्यब्रह्माची अचूक उपासना झाली तरच कारण ब्रह्मद्वारा आपल्याला आनंद प्राप्त होतो, हा आनंद व्यक्त करण्यासाठी सण–समारंभाचे आयोजन असते. हा आनंद आपल्या व्यक्तिगत जीवनात आणि राष्ट्रजीवनात यश आणि आनंद देत असतो.

उपनिषद सांगतात की, या पृथ्वीतलावर आजपर्यंत अक्षरशः अनंत प्राणी जन्माला आले आणि गेलेही. नुसता माणसांचा विचार केला तर असे दिसते की कोटयावधी माणसे जन्माला आली आणि मेलीही. परंतु खऱ्या अर्थाने ज्याला आनंद म्हणता येईल असा आनंद फार कमी जीवांना मिळाला आहे. ज्याचे कारण जीवनातील सत्य ज्ञानाचा अभाव. उपनिषदे मानवी जीवनातील दुःखाचे कारण सांगतांना म्हणतात की, मानवी जीवनावर अविद्येचा अंमल चालतो त्यामुळे आनंदाच्या दिशेने वाटचाल करीत असतांना दुःख भोगच त्याच्या वाटयाला जास्त येतात.

''सुख पाहता जवापाडे
दुःख पर्वताएवढे ।।

अशी कित्येकदा अनुभूती येते. आपले राष्ट्रीय जीवन हे आनंदाने भरून जायचे असेल, वैभव संपन्नतेने जगात सन्मानाने नांदायचे असेल तर अविद्येचा नाश करणारे, निर्भय होवून कार्य ब्रह्माची उपासना करणारे तत्त्वज्ञान राष्ट्रजीवनाला आवश्यक आहे.

## निष्कर्ष –

1) कवी गोविंदसुतांची अजबळी कविता ही एक विचारप्रवर्तक कविता आहे.
2) प्रस्तुत कवितेचा आशय संवादात्मक आहे.
3) प्रस्तुत कवितेत मानवी वाचा नसलेल्या बकऱ्याला मुखर केलेले आहे.
4) बळी जाणारा बकरा आर्त भावनेने ईश्वराची प्रार्थना करतो अशी कविने कल्पना केलेली आहे.
5) प्रस्तुत कवितेतील संवाद हा एक काल्पनिक असलेला परंतु विचार–प्रवर्तक संवाद आहे.
6) प्रस्तुत कवितेची अभिव्यक्ती ही चेतनगुणोक्ती अलंकार व अर्थान्तरंन्यास अलंकाराचा सुंदर नमुना आहे. त्यामुळे प्रस्तुत कवितेला आशय घनतेचे मूल्य लाभलेले आहे.

7) मुलतः कविला 'देवो दुर्बल घातकाः' या संस्कृत सुभाषितातील आशय मांडावयाचा आहे असे स्पष्टपणे जाणवते.
8) कवितेत कविचे स्वतःचे एक गृहीतक आहे. कविने स्विकृत गृहीतकाला घटनेच्या चौकटीत बसवले आहे.
9) कवितेला गृहीतकं, घटनाक्रम व निष्कर्श असा क्रम असून ''सबलांच्या जगती, ईशा हसविण्या जातो अजांचा बळी'' असा निष्कर्श मांडलेला आहे.
10) सरते शेवटी कविने प्रत्येकच जीवाला ''जाणोनी जगी सत्य हेच ठरवा ना होई मी अजबळी'' असा सावधानतेचा ईशारा दिला आहे.
11) एकूणच आशय–अभिव्यक्ती आणि काव्यमूल्य हा तीन्ही दृष्टीने प्रस्तुत कविता अत्यंत परिणामकारक झाली आहे.
12) मोजक्या शब्दात व्यापक आशयाला गवसनी घालणे हे अस्सल कविचे सामर्थ्य विशेषत्वाने येथे प्रत्ययाला येते.

## संदर्भ –


1) कलियुगातील ध्रुवतारा
क्वी – गोविंदसुत
साहित्यप्रसार केंद्र
प्रथमावृत्ती 2010

2) सुभाषितरत्नभाण्डागारम्
प्रकाशक – चौरवम्बा प्रकाशन
चैरवम्बा संस्कृत सिरिज, वाराणसी
संपादक – नारायण राम आचार्य (काव्यतीर्थ)

3) उपनिषदांचा अभ्यास – प्रा.के.वि. बेलसरे
त्रिदल प्रकाशन, प्रार्थना समाजजवळ,
गिरगाव मुंबई 400004
सुधारित द्वितीय आवृत्ती 13 जुलै 2003


LBP PUBLICATION